वर्ष - 7 । अंक - 136 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™ गणेशोत्सव

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 20 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या उत्साहात

# घरोघरी बाप्पांचे आगमन!

### » गणरायाच्या स्वागताला वरुणराजाची हजेरी: मंडळांच्या कार्यकर्त्यांचीही एकच लगबग




। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**श्रावण संपला रम्य चतुर्थीची पहाट झाली, सज्ज व्हा उधळण्यास पुष्पे आली..आली...गणाधिशाची स्वारी आली.... अशाच रम्य व भक्तीमय वातावरणात उद्योगनगरी पिंपरी चिंचवडमध्ये बाप्पा घरोघरी विराजमान होत आहेत. शहरातील बाजारपेठ फुले, पुजेचे साहित्य, प्रसाद, गणरायाच्या मुर्ती, सजावटीचे साहित्य यांनी अक्षरशः फुलून गेल्या आहेत.**

भाविकांनी जमेल त्या पद्धतीने गणरायाला आपल्या घरी आणले. बाप्पा दुचाकी, कार तर काहींच्या घरी अगदी पायी तेवढ्याच भक्तीभावाने आले. घरगुती गणपती प्रमाणे मंडळांच्या कार्यकर्त्यांचीही एकच लगबग सुरु असल्याचे पहायला मिळाले. वेळेत प्राणप्रतिष्ठापणा कऱण्यासाठी सर्व जण मन लावून तयारी करत आहेत. गणरायाच्या या आगमनाला वरुणराजानेही काल पासूनच हजेरी लावली आहे. पावसाच्या सरीमध्ये भिजत बाप्पा घरी जात आहेत. सध्या कमी दाबाचे क्षेत्र पश्चिमेकडे सरकल्यामुळे पुण्यासह राज्याच्या अनेक भागात पावसाने उघडीप दिली आहे. कोकण, घाटमाथा, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाने हजेरी लावली आहे.

या सर्व गणेशोत्सवावर पोलिसांची देखील करडी नजर असून नागरिकांना कोणताही अनुचित प्रकार दिसला असता त्वरीत पोलिसांशी संपर्क कऱण्याचे आवाहान पोलिसांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिके देखील या उत्सवासाठी पुर्णपणे सज्ज झाली आहे.





## अभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या घरी बाप्पाचं आगमन

» दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णीच्या घरी गणपती बाप्पाचं आगमन झालं आहे. यावर्षी सोनालीने गणपती बाप्पाच्या माध्यमातून संत तुकोबांचे रूप साकारले आहे. गेल्या वर्षी काही कारणामुळे सोनाली गणपती उत्सव साजरा करू शकली नव्हती. त्यामुळे यावर्षी ती मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करते आहे. सोनाली्या घरी गणपती बाप्पाचं आगमन झाले आहे. सोनाली आणि तिचा भाऊ अतुल हा दरवर्षी इको फ्रेंडली गणपती साकारतात. गणपती बाप्पाच्या माध्यमातून तिने तुकोबांचे रूप साकारले आहे. यावर्षी महाराष्ट्रामधील अनेक भागांमध्ये वरून राजाने कृपादृष्टी दाखवली नाही. अनेक भागात दुष्काळाचे सावट आहे. महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस पडावा आणि बळीराजा सुखी व्हावा असं साकडं सोनालीने गणपती बाप्पा चरणी घातलं आहे. गेल्या वर्षी सोनालीच्या आजीचं निधन झालं होतं त्यामुळे तिने गणपती उत्सव साजरा केला नव्हता. यावर्षी गणेशोत्सव साजरा करत तिने गणपती बाप्पाची इको फ्रेंडली मूर्ती आजीला समर्पित केली आहे.

## गणेशोत्सवात 3 हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात



» गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कंबर कसली आहे. शहरात तीन हजारपेक्षा अधिक पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दीड हजारपेक्षा अधिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव कालावधीत शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर येते. पिंपरी-चिंचवड शहरात गणेशोत्सवासाठी बाहेरून बंदोबस्त मागवण्यात आला आहे. गणेशोत्सवासाठी एक अपर पोलीस आयुक्त, पाच उपायुक्त, आठ सहायक आयुक्त, ५० पोलीस निरीक्षक, १४५ सहायक निरीक्षक आणि उपनिरीक्षक, एक हजार ८४० अंमलदार एवढे मनुष्यबळ उपलब्ध आहे. चार पोलीस निरीक्षक, २० सहायक निरीक्षक आणि उपनिरीक्षक, ४०० पोलीस कर्मचारी, ६०० होमगार्ड, एसआरपीएफच्या दोन कंपनी, श्वान बॉम्ब शोधक आणि नाशक विभागाची दोन पथके ही अधिकची कुमक शहर पोलिसांना मिळाली आहे. गणेशोत्सव कालावधीत पाच दिवस रात्री बारापर्यंत ध्वनिक्षेपक लावण्यासाठी परवानगी दिली आहे. २३ ते २८ सप्टेंबर या दिवशी ही परवानगी असेल. सातव्या दिवशी अनेक भागातील विसर्जन होते. मात्र, त्या दिवशी ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे रात्री दहा वाजता ध्वनिक्षेपक बंद करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# आता शाळा दत्तक घेता येणार!

## शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना' राबवण्यात येणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी 'दत्तक शाळा योजना' राबवण्यात येणार आहे. ही योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर आता शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, देणगीदाराला पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळा दत्तक घेता येईल.**

राज्यातील शहरी, ग्रामीण भागात समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिस आदींच्या सहकार्यातून शाळांसाठी पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनांची उपलब्धता वाढवून त्याद्वारे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षणाचा प्रसार करण्याचा या योजनेचा मूळ उद्देश आहे. यात समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्यांना विशिष्ट शाळा दत्तक घेता येईल. या शाळेच्या गरजेनुसार त्यांना आवश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा करता येईल. त्याचप्रमाणे अतिरिक्त वर्ग खोल्यांचे बांधकाम, इमारतींची दुरुस्ती, देखभाल व रंगरंगोटी या मार्गाचा देखील अवलंब करण्यास मुभा असेल. दत्तक शाळा योजनेंतर्गत सर्वसाधारण पालकत्व, नामकरण आधारित विशिष्ट पालकत्व अशा दोन पद्धतीने देणगी देता येईल. 'अ' आणि 'ब' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी पाच वर्षे कालावधीसाठी देणगीचे मूल्य दोन कोटी, दहा वर्षे कालावधीसाठी



तीन कोटी रुपये राहील. तर 'क' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे एक कोटी आणि दोन कोटी रुपये, तसेच 'ड' वर्ग महानगरपालिका, नगर परिषदा व ग्रामीण भागातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे ५० लाख आणि एक कोटी रुपये होत असल्यास देणगीदाराच्या इच्छेनुसार त्याने सुचवलेले नाव शाळेस त्या विशिष्ट कालावधीसाठी देता येईल. या योजनेत रकमेच्या स्वरूपात देणगी देता अथवा स्वीकारता येणार नाही. कॉर्पोरेट ऑफिसना सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारची देणगी देता येईल. स्थापत्य व विद्युत काम, काळानुरूप आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने, आरोग्य सुविधा, रेन वाटर हार्वेस्टिंग, सॅनिटरी पॅड यंत्र अशा पायाभूत आणि भौतिक सुविधांसाठी वस्तू, सेवांच्या स्वरूपात देणगी देता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात येईल. एक कोटी आणि त्याहून अधिक मूल्यांचे प्रस्ताव या समितीस सादर करण्यात येतील. क्षेत्रीय स्तरावर महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या शाळांसाठी अनुक्रमे आयुक्त, महानगरपालिका, संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावर समन्वय समिती स्थापन करण्यात येतील. या समितीस एक कोटीहून कमी मूल्याच्या प्रस्तावांची छाननी करून त्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील.

### पाच वर्षे कालावधीसाठी दोन कोटी रुपये

» दत्तक शाळा योजनेंतर्गत सर्वसाधारण पालकत्व, नामकरण आधारित विशिष्ट पालकत्व अशा दोन पद्धतीने देणगी देता येईल. 'अ' आणि 'ब' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी पाच वर्षे कालावधीसाठी देणगीचे मूल्य दोन कोटी, दहा वर्षे कालावधीसाठी तीन कोटी रुपये राहील. तर 'क' वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे एक कोटी आणि दोन कोटी रुपये, तसेच 'ड' वर्ग महानगरपालिका, नगर परिषदा व ग्रामीण भागातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे ५० लाख आणि एक कोटी रुपये होत असल्यास देणगीदाराच्या इच्छेनुसार त्याने सुचवलेले नाव शाळेस त्या विशिष्ट कालावधीसाठी देता येईल. या योजनेत रकमेच्या स्वरूपात देणगी देता अथवा स्वीकारता येणार नाही. कॉर्पोरेट ऑफिसना सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारची देणगी देता येईल.

# शहरातील वाहतुकीत आजपासून बदल!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन बुधवारपासून (२० सप्टेंबर) मध्यभागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन सायंकाळी पाचनंतर मध्यभागातील रस्ते वाहतुकीस बंद करुन वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शिवाजी रस्त्यावरील बेलबाग चौक ते रामेश्वर चौक (मंडई) दरम्यानची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. मध्यभागातील वाहतूक बदल विसर्जन मिरवणुकीपर्यंत लागू राहणार आहे. शिवाजीनगर भागातून स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांनी वेधशाळा चौक, शाहीर अमर शेख चौक, बोल्हाई चौकमार्गे पुणे स्टेशनकडे किंवा नेहरु रस्त्याने स्वारगेटकडे जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. बाजीराव रस्ता, तसेच केळकर रस्त्यावरुन येणाऱ्या वाहनांनी अप्पा बळवंत चौक, फुटका बुरूज चौक, गाडगीळ पुतळा, कुंभारवेस मार्गे इच्छितस्थळी जावे. शिवाजी रस्त्यावरील जिजामाता चौक ते बेलबाग चौक, रामेश्वर चौक ते मंडई, शनिपार चौक, सेवासदन चौक ते अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक, अप्पा बळवंत चौक ते फुटका बुरूज चौक या भागात सर्व प्रकारची वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. २० ते २७ सप्टेंबर या कालावधीत सायंकाळी पाचनंतर गर्दी ओसरेपर्यंत कुमठेकर रस्ता, सदाशिव पेठ, घोरपडे पेठेतील सिंहगड गॅरेज रस्ता, महापालिका कार्यशाळा चौक, लष्कर भागातील महात्मा गांधी रस्त्यावरील कोहिनूर चौक ते भगवान महावीर चौक दरम्यान असलेल्या एकेरी वाहतुकीचे आदेश शिथिल करण्यात येणार आहेत.

# दया नको, समान वागणूक हवी!

## तृतीयपंथी समाजसेविका आम्रपाली यांचे मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्हाला दया नको तर समान वागणूक हवी, असे तृतीयपंथी समाजसेविका अमित उर्फ आम्रपाली मोहिते यांनी 'स्व-' रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेच्या श्रीमकांचा बाप्पा उपक्रमात बोलताना व्यक्त केले. यावेळी आम्रपाली यांच्या हस्ते गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.**

आम्रपाली यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना तृतीयपंथी समाजाच्या व्यथा मांडल्या. तृतीयपंथींना सहानुभुती नव्हे तर समान वागणुकीची गरज आहे. ते ही आपल्या समाजातील एक घटक आहेत हे मान्य करून त्यांना आपलेपणाने स्वीकारा. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून



### संविधानाचा सरनामा देऊन सन्मान

» आम्रपाली सावली सोशल फौंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष आहेत. तृतीयपंथींच्या न्याय हक्कासाठी काम करताना त्यांनी पुणे शहरात सहा ठिकाणी गरीब मुलांसाठी 'फुटपाथ शाळा' सुरु केल्या. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी १४५ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उभा केला, तसेच 192 लोकांना छोटे व्यवसाय सुरु करून दिले आहेत. 'स्व-' रूपवर्धिनी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ संजय तांबट, संस्थेच्या जेष्ठ पूर्णवेळ कार्यकर्त्या पुष्पाताई नडे यांनी आम्रपाली मोहितेंचा भारतीय संविधानाचा सरनामा देऊन सन्मान केला.

द्या, असे आम्रपाली यांनी सांगितले. आम्रपाली सावली सोशल फौंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष आहेत. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी १४५ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उभा केला, तसेच 192 लोकांना छोटे व्यवसाय सुरु करून दिले आहेत. 'स्व-' रूपवर्धिनी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ संजय तांबट, संस्थेच्या जेष्ठ पूर्णवेळ कार्यकर्त्या पुष्पाताई नडे यांनी आम्रपाली मोहितेंचा भारतीय संविधानाचा सरनामा देऊन सन्मान केला.

३५ व्या पुणे फेस्टिव्हलच्या श्रींची प्रतिष्ठापना हॉटेल सारस, नेहरू स्टेडियम, पुणे येथे स्वाती व विक्रम कुमार (आयुक्त, पुणे महानगरपालिका) यांच्या शुभहस्ते विधिवत संपन्न झाली. याप्रसंगी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी आणि प्राजक्ता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड,, माजी महापौर कमल व्यव्हारे , डेक्कन मुस्लिम इंस्टीट्यूटचा अध्यक्षा आबेदा इनामदार, बाळासाहेब अमराळे, राजू साठे, द.स पोळेकर, अतुल गोंजारी, राजू साठे, अशोक मेंमजादे, रवींद्र दुर्वे , सुप्रिया ताम्हाणे, संयोगिता कुदळे, अनुराधा भारती ,निकिता मोघे व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सनातन भक्तीचे फळ भावी पिढीच्या हिताचे!

## शिव महापुराण कथा : कथेच्या पाचव्या दिवशी पं. प्रदीप मिश्र यांची शिकवण





## मूर्तीमध्ये प्राण फुंकण्याची कला केवळ भारत देशात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"रक्तामध्ये वाढलेली साखर हा आजार आहे. हा आजार पित्याला झाला, तसा तो मुलाला, नातवालादेखील होवू शकतो, हे अनुवंशिक आहे. त्याचप्रमाणे तुम्ही जर सनातन धर्माची भक्ती मनापासून करत असाल त्याचे पुण्यदेखील तुमच्या मुलाला, नातवाला मिळते. कारण, भक्तीचा लाभसुद्धा अनुवंशिक आहे. त्यामुळेच सनातन धर्माची भक्ती करतानाही ती मनापासून करा. त्याचे फळ कदाचित तुम्हाला मिळाले नाही, तर ते तुमच्या मुलांना किंवा नातवांना मिळणार असल्याची खात्री आहे, असा संदेश देत पं. प्रदीप मिश्रा यांनी छोट्या-छोट्या उदाहरणातून सनातन धर्माची महती उपस्थित भाविकांना सांगितली.**

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने 'श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा' सोहळ्याचे आयोजन नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर करण्यात आले आहे. या सोहळ्यासाठी भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप मुख्य निमंत्रक आहेत.

'पीएमआरडीए'चे आयुक्त राहुल महिवाल, माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, हभप सोपान महाराज शास्त्री, माऊली महाराज पठाडे, प्रकाश महाराज साठे, माजी महापौर माई ढोरे, अधीक्षक अभियंता संजीव राठोड, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, सुरेश चिंचवडे, तात्यासाहेब आहेर, माऊली सूर्यवंशी, इस्कॉनचे प्रमुख कन्हैया प्रभू, इस्कॉनचे ब्रजेशजी पांडे, पोपटराव शिवले, चंद्रहास वाल्हेकर, राजाभाऊ भुजबळ, कांतीशेठ भूमकर, मधुकर रणपिसे, पुण्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक अशोक मोराळे, भानुदास काटे पाटील, हेमंत पाटे, राजाभाऊ गोलांडे, सुनील जाधव, सतीश दरेकर, राजाभाऊ विनोदे यांनी कथ श्रवणाचा आनंद घेतला.

भारत एक महान देश आहे. केवळ याच देशात आपण मूर्तीमध्ये देखील प्राण फुंकू शकतो. आज गणेश चतुर्थी आहे, आज आपण सर्वांनीच गणपतीबाप्पाची मूर्ती खरेदी केली. मात्र, त्याची अदा केलेली किंमत ही, केवळ ती मूर्ती घडविणाऱ्याला दिली.

मात्र, त्या मूर्तीमध्ये आपण घरी येवून स्वस्तिक काढून दहा दिवसांसाठी प्राणप्रतिष्ठा करतो, प्राणप्रतिष्ठेच्या माध्यमातून त्या मूर्तीमध्ये प्राण फुंकतो. त्यावेळी खरोखरीच बाप्पा आपल्या मूर्तीमध्ये वास्तव्यास येतात, आणि त्या बाप्पाचे आपण पुढील दहा दिवस आदरातिथ्य करतो, असे म्हणताना, आध्यात्माची शक्ती पं. प्रदिपजी मिश्रा यांनी विशद केली.

### भजन गाणाऱ्या कलाकारांसाठी कौतुकाची थाप

» आज पाचव्या दिवशी पं. मिश्रा यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने अनेक भजने सादर करण्यात आली. या भजनाच्या तालावर अनेक भाविकांनी ठेका धरला. मंत्रमुग्ध होवून गाणारे कलाकार आणि तेवढ्याच उत्कटतेने त्यांना साथ देणारे भाविक, हीच जुगलबंदी आज रंगली होती. अनेक भाविकांनी टाळ्या आणि हात उंचावून भजन म्हणणाऱ्या कलाकारांनाही मनापासून दाद दिली. भजनानंतर झालेल्या आरतीने भक्तीमय वातावरणाची निर्मिती झाली आणि पाचव्या दिवसाची कथा पूर्णत्वास गेली.

### मेरी माटी मेरा देश... अभियानासाठी पंचप्राण शपथ...


» दरम्यान, भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी, जवानांनी, क्रांतिवीरांनी स्वत:च्या जीवाची आपल्या घरादाराची-कुटुंबाची पर्वा न करता भारतभूमीसाठी प्राण दिले. बलिदान केले. अशा भारतमातेच्या वीर सुपुत्रांचे स्मरण, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार "मेरी माटी मेरा देश" अभियानाच्या निमित्ताने आज लाखो भाविकांच्या उपस्थितीत "पंचप्राण शपथ" घेण्यात आली. भारत देश २०४७ पर्यंत सर्वक्षेत्रात आत्मनिर्भर व्हावा. या करिता प्रत्येकाने योगदान देण्याचा संकल्प या निमित्ताने केला.

# राज्यघटनेचे संरक्षण की मोडतोड?




**जगातील सर्वात जुन्या लोकशाहीपैकी एक असलेल्या ब्रिटनसारख्या देशाला लिखित राज्यघटना नाही, पण एक सर्वसत्ताधीश (राजा किंवा राणी) आहे, तरीही तेथील लोकशाही ही घटनात्मक लोकशाहीसाठी एक मॉडेल मानली जाते. 'राज्यघटने'नुसार सुरू असलेले ब्रिटनचे प्रशासन लिखित राज्यघटना असलेल्या देशांपेक्षा श्रेष्ठ आहे.**

व्ही-डेम इन्स्टिट्यूटने उदारमतवादी लोकशाहीच्या यादीत डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, स्वित्झलड यांसारख्या देशांचा, तर निरंकुश सत्ता असलेले बंदिस्त देश चीन, इराण, म्यानमार या देशांचा उल्लेख केला आहे. मला असं वाटतं की भारत या दोन्हींच्या मध्ये येतो. भारतात एक विस्तृत, लिखित राज्यघटना आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तसेच मसुदा समिती आणि घटना सभेतील त्यांच्या सहकाऱ्यांना राज्यघटनेचा मसुदा पूर्ण करण्यासाठी आणि राज्यघटना स्वीकारण्यासाठी दोन वर्षे, ११ महिने आणि १७ दिवस लागले. घटना सभेतील चर्चा या लोकशाहीतील वादविवाद, मतभेद आणि निर्णय प्रक्रिया यांचे प्रारूप आहेत. आपण गेली ७३ वर्षे या राज्यघटनेनुसार काम करत आहोत. संसदेला जेव्हा जेव्हा घटनात्मक तरतुदींमध्ये उणिवा आढळल्या – आणि कधी कधी तर त्या नसतानाही संसदेने घटना दुरुस्ती केली. आतापर्यंत १०६ घटनादुरुस्ती कायदे करण्यात आले आहेत. आणीबाणी



लागू झाली तेव्हा राज्यघटनेला उघड आणि गंभीर धोका निर्माण झाला होता, असे अनेक कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे. एरवीही राज्यघटनेला छुप्या आव्हानांना सामोरे जावे लागल्याची उदाहरणे आहेत, तेव्हाही राज्यघटनेला धक्के बसले, पण ती टिकून राहिली. असे प्रसंग सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत घडले, तेव्हा न्यायालयही अडखळले, पण ते योग्य वेळी सावरले. न्यायालयाने हे सिद्ध केले की आपल्या चुका मान्य करण्याची नम्रता त्या व्यवस्थेकडे आहे. ए. के. गोपालन, आय. सी. गोलक नाथ आणि ए. डी. एम. जबलपूर, ही न्यायालयाची या संदर्भातली उदाहरणे. न्यायालयाने स्वत:ला दुरुस्त केल्याची आणि उदारमतवादी लोकशाही राज्यघटनेची मूलभूत तत्त्वे ठामपणे मांडण्याची उदाहरणे म्हणजे मनेका गांधी, एस. आर. बोम्मई, केशवानंद भारती आणि के.एस. पुट्टास्वामी. अलीकडच्या काही घटनांमुळे चिंता वाढली आहे. माझ्या मते, ते राज्यघटनेवरील छुपे हल्ले आहेत. ५ ऑगस्ट २०१९ रोजी, जम्मू आणि काश्मीर राज्याचे विभाजन करण्यात आले आणि दोन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. या कृतीच्या कायदेशीरतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे.

राज्यघटनेचा चुकीचा अर्थ लावला गेला, संसदेने संसदेचा सल्ला घेतला आणि संसदेचा 'विचार' घेतल्यानंतर, संसदेने राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये रूपांतर केले. भविष्यात इतर कोणत्याही राज्यात असे होणार नाही याची कोणतीही खात्री देता येत नाही.केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेश दिल्ली GNCTD चे १९९२ पासूनचे अधिकार हिरावून घेणारे कायदे केले. या प्रसंगी, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला फटकारले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारने दिल्ली राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांवरील मंत्र्यांचे नियंत्रण काढून घेणारा आणि ते अधिकार नायब तहसीलदारांना देणारा कायदा केला. त्यामुळे लोकांमधून निवडून आलेल्या मंत्र्यांना आता सनदी सेवक आणि नायब तहसीलदार यांच्या तालावर नाचावे लागणार आहे. भारतीय निवडणूक आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे, तिच्याकडे प्रचंड अधिकार आहेत. त्यामुळे ही संस्था दर पाच वर्षांनी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेऊ शकते. लोकशाहीसाठी आपल्या वचनबद्धतेचे नूतनीकरण करण्याची ती गुरुकिल्ली आहे. अनुप बरनवाल प्रकरणामध्ये, सर्वोच्च न्यायालयाने ही पक्षविरहित यंत्रणा (पंतप्रधान, भारताचे सरन्यायाधीश आणि विरोधी पक्षनेते) निवडणूक आयुक्तांची निवड करेल याची व्यवस्था केली. पण केंद्र सरकारने हा निर्णय रद्दबातल ठरवला आणि मुख्य न्यायाधीशांच्या जागी पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेले मंत्री असतील असा कायदा केला. या कायद्याला दिलेले कायदेशीर आव्हान टिकून राहिले, तर तो भारतातील लोकशाहीचा मार्ग बदलू शकतो. राज्य विधानसभा विधेयके संमत करतात. घटनेच्या अनुच्छेद २०० अन्वये, राज्यपाल एखाद्या विधेयकाला संमती देऊ शकतात, ती रोखू शकतात किंवा राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवू शकतात. काही राज्यपाल वरीलपैकी काहीही करत नाहीत; ते ती विधेयके तशीच ठेवून स्वस्थ बसून राहतात. त्याप्रमाणे विधान परिषदेवर काही व्यक्तींना नामनिर्देशित करण्याच्या प्रस्तावांबाबतदेखील काही राज्यपाल काहीच करत नाहीत.

## संपादकीय »

# दुभंगता विकास!

***केवळ रोषणाई म्हणजे शहर सौंदर्यीकरण, घोषणा म्हणजेच वास्तव आणि अस्मितावाद म्हणजेच राजकारण- अशा अवस्थेत नगर व्यवस्थांची उसवती वीण लक्षातही घेण्यास कोणी तयार नाही..***

गेले दोन दिवस 'लोकसत्ता'ने गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाऊ इच्छिणाऱ्यांची ससेहोलपट चव्हाटय़ावर मांडली. तासाला १२०० इतक्या प्रचंड गतीने दुथडी भरून वाहणाऱ्या बसगाडय़ा, रेल्वेच्या बेफिकिरीने स्थानकांस आलेले निर्वासित छावण्यांचे स्वरूप, सागरी मार्ग उपलब्ध नाही आणि विमानांची सोय नाही.

कोठेही न जाता शहरांत राहू इच्छिणाऱ्यांच्या हालअपेष्टा तर कुत्राही खाण्यास तयार नाही, खड्डेयुक्त मार्गांनी शहरांतर्गत वाहतुकीची पार उडालेली दैना, 'मेट्रो'च्या स्वप्नांचे मृगजळ आणि देशातील सगळय़ात गर्दीची 'मेट्रो' मार्गिकाही नुकसानीत निघालेली, (रविवारच्या अंकात गावोगावच्या मेट्रोचे गंभीर आर्थिक वास्तव पाहावयास मिळते), त्यात एखादा सण आला तर पोटात गोळा यावा अशी नागरी स्थिती.

**हैदराबादमध्ये झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाच्या नेत्यांचे 'भाजपच्या कोणत्याही प्रकारच्या सापळय़ात अडकू नका,' असे कान टोचले ते एका अर्थाने बरेच झाले. पक्षाचे नेते हा इशारा कितपत गांभीर्याने घेतात हे कालांतराने स्पष्ट होईल. सनातन धर्मावरून तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी यांनी केलेल्या विधानावरून काँग्रेस नेते सापळय़ात कसे अलगद अडकत गेले हे ताजे उदाहरण.**

# सापळय़ात अडकते कोण?

तमिळनाडूतील द्रविडी संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर स्टॅलिन पुत्र काही बोलले असले तरी काँग्रेस नेत्यांना नाक खुपसण्याची काहीही आवश्यकता नव्हती. पण काँग्रेस पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे पुत्र कर्नाटकमधील मंत्री प्रियंक खरगे यांनी स्टॅलिन यांना पाठिंबा दर्शविताना सनातन धर्माला रोगाची उपमा दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांच्या इंडिया आघाडीत फूट पाडण्यासाठी स्टॅलिन पुत्राच्या सनातन धर्माच्या वादावर योग्य प्रत्युत्तर देण्याचा आदेश पक्षाचे मंत्री व नेत्यांना दिला. भाजपने टाकलेल्या सापळय़ात काँग्रेसचे एकापाठोपाठ एक नेते अडकत गेले. हा काही नवीन प्रकार नाही. पुलवामा हल्ल्यानंतर पक्षाच्या काही नेत्यांची वादग्रस्त विधाने पक्षाला गेल्या लोकसभा निवडणुकीत महागात पडली होती. याआधी विश्व हिंदू परिषद, भाजप आणि रा. स्व. संघाने सुरू केलेल्या रामजन्मभूमी आंदोलनातही काँग्रेस पक्ष सत्तेत असतानाही सापळय़ात अलगद



अडकत गेला. काँग्रेसवर मुस्लीम तुष्टीकरणाचा आरोप होत असताना पक्षाने हिंदू विरोधी भूमिका घेऊ नये, असे पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ज्येष्ठ नेते विठ्ठलराव गाडगीळ यांनी मत मांडले होते. तुष्टीकरणाचा आरोप करण्यात भाजप आघाडीवर होता व तेव्हाही भाजपच्या सापळय़ात काँग्रेस अडकला होता. हा झाला सारा इतिहास. मतांच्या ध्रुवीकरणावर भाजपचा प्रयत्न लपून राहिलेला नाही. अशा वेळी काँग्रेस नेत्यांनी सावध भूमिका घेणे अपेक्षित असते. पण राहुल गांधी म्हणतात तसे भाजपच्या असंबद्ध किंवा अप्रस्तुत सापळय़ात काँग्रेसचे वाचाळवीर सहजपणे अडकतात. भाजपच्या आक्रमक हिंदूत्वाच्या राजकारणाला शह देण्याकरिता काँग्रेसने सामाजिक मुद्दय़ाला हात घातला आहे. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या सध्याच्या कमाल मर्यादेत वाढ करण्याबरोबरच जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. जातनिहाय जनगणनेला भाजपचा विरोध लपून राहिलेला नाही. अशा वेळी भाजपची कोंडी करण्याकरिता हा मुद्दा पक्षाला उपयोगी पडू शकतो. सतत सरकारच्या विरोधात नकारात्मक बोलून किंवा मतप्रदर्शन करून फायदा होत नाही. त्याऐवजी कोणता कार्यक्रम हाती घेणार हे लोकांना समजावून सांगावे लागते. जातनिहाय जनगणना किंवा आरक्षणाचा मुद्दा हाती घेऊन काँग्रेसने किमान सामाजिक मुद्दा पक्षाच्या कार्यक्रम पत्रिकेवर असेल हे अधोरेखित केले. शेजारील कर्नाटकच्या विजयाने तेलंगणामध्ये काँग्रेसच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. कर्नाटकप्रमाणेच शेतकरी, महिला, युवक-युवती, वरिष्ठ नागरिकांची मते जिंकण्यासाठी आश्वासनांची खैरात करण्यात आली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गोपीचंद पडळकर यांचे वक्तव्य अयोग्य!

## » तिन्ही पक्षातील नेत्यांचा सन्मान ठेवला पाहिजे : फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार गोपीचंद पडळकर यांचे वक्तव्य अयोग्य आहे. अशा प्रकारचे वक्तव्य करणे चुकीचे आहे. तिन्ही पक्षातील नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी आणि आमदारांनी तिन्ही पक्षातील नेत्यांचा सन्मान ठेवला पाहिजे आणि अशा प्रकारच्या भाषेचा उपयोग करू नये, असे माझे स्पष्ट मत आहे, असे मत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.**

दरम्यान देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, लोकशाहीत महिलांचा सहभाग वाढला पाहिजे. महिलांना वाव मिळाला पाहिजे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करत आभार मानत आहोत. सर्व जण याला पाठिंबा देतील कुणी याला विरोध करणार नाही, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भावना आमच्याबद्दल स्वच्छ नाही. त्यामुळे त्यांना पत्र देण्याची गरज नाही. लबाड लांडग्याचे लबाड पिल्लू आहे ते. त्यामुळे त्यांना आम्ही मानत नाही. म्हणून आम्ही त्यांना पत्र दिले नाही आणि या पुढेही देण्याची आवश्यकता वाटत नाही. ज्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळू शकतो त्या दोघांना मी पत्र दिले आहे,



असे पडळकर म्हणाले. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी सत्तेत सहभागी झालेल्या अजित पवारांवर जहरी टीका केली. यामुळे भाजप आणि अजित पवार गट यांच्यात वादाची ठिणगी पडल्याचे पाहायला मिळाले.

पडळकरांच्या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यभरात चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाकडून आंदोलन करण्यात आले आहे. आमदार गोपीचंद पडळकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाबत केलेल्या चुकीच्या वक्तव्याच्या विरोधात नाशिक शहर व जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने निषेध व्यक्त करत पडळकरांच्या फोटोला जोडो मारो आंदोलन करण्यात आले.

आमदार पडळकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बाबत केलेल्या चुकीच्या वक्तव्याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत निषेध व्यक्त केला. नाशिक शहरातील राष्ट्रवादी भवन कार्यालयाच्या बाहेर आमदार गोपीचंद पडळकर यांच्या फोटोला जोडे मारत आंदोलन करण्यात आले. तसेच पडळकरांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

### राज्यभरात पडळकरांविरोधात आंदोलन

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भावना आमच्याबद्दल स्वच्छ नाही. त्यामुळे त्यांना पत्र देण्याची गरज नाही. लबाड लांडग्याचे लबाड पिल्लू आहे ते. त्यामुळे त्यांना आम्ही मानत नाही. म्हणून आम्ही त्यांना पत्र दिले नाही आणि या पुढेही देण्याची आवश्यकता वाटत नाही. ज्यांच्याकडून आम्हाला न्याय मिळू शकतो त्या दोघांना मी पत्र दिले आहे, असे पडळकर म्हणाले. भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी काही दिवसांपूर्वी सत्तेत सहभागी झालेल्या अजित पवारांवर जहरी टीका केली. यामुळे भाजप आणि अजित पवार गट यांच्यात वादाची ठिणगी पडल्याचे पाहायला मिळाले. पडळकरांच्या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यभरात चोख प्रत्युत्तर देण्यात येत आहे. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाकडून आंदोलन करण्यात आले आहे.

# हे सरकार नालायक आहे!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

कंत्राटी भरती हा तरुणांच्या आयुष्याची वाट लावणारा हा निर्णय आहे. त्यामुळे हा आदेश रद्द करण्यासाठी तरुणांना रस्त्यावर उतरावे लागेल. आंदोलन करून सरकारला आदेश मागे घेण्याचा निर्णय घेण्यास बाध्य करावे लागेल. तरुणांचे भविष्य अंधकारमय करणारे हे नालायक सरकार आहे, अशी कडवट टीका करत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. दरम्यान विजय वडेट्टीवार म्हणाले की, अजित पवार पक्ष फोडून गेले आहे. आता त्यांनी तरुणांना उध्वस्त करण्याचे पाप करू नये. 06 सप्टेंबर 2023 पासून राज्य सरकार हा अध्यादेश लागू करणार आहे. हा आमचा निर्णय होता, असे आत्ताच सरकार सांगत आहे. मात्र, हा निर्णय आमच्यावेळी फक्त पंधरा प्रवर्गासाठी होता. यामध्ये संगणक चालक, डाटा ऑपरेटर यांचा समावेश होता. मात्र, सरकारने यामध्ये बदल करून शिपाई ते इंजिनियर सर्व पदांचा समावेश केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, खाजगी नोकरी कंत्राटी भरतीच्या मुद्यावर अजित पवार खोटे बोलत आहेत. ते तरुणांची फसवणूक करीत आहेत, असे सांगत वडेट्टीवार यांनी अजित पवारांवर जोरदार निशाणा साधला. खाजगी नोकरी कंत्राटी देण्याच्या निर्णय मागे न घेतल्यास आम्ही तीव्र विरोध करूच पण तरुणांनी आपले अंधकारमय भविष्य लक्षात घेता आता आक्रमक होऊन आरपार लढाई लढण्याची गरज आहे. सर्वसामान्यांचे सरकार अशी बिरुदावली मिरवत शिंदे सरकारची सरकारी तिजोरीतून स्वार्थासाठी उधळपट्टी सुरू आहे. त्यात आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या एका खासगी मित्राचीही भर पडली आहे. सामान्य जनतेचे कोट्यवधी रुपये त्यांनी या 'मित्रा'वर उधळले आहेत.

# सत्तेपुढे शहाणपण चालत नाही!

## » माझा कुणाशीही पर्मनंट करार नसतो : सत्तार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लोक मला विचारतात की, तुम्ही प्रत्येक मंत्रिमंडळात कसे असता? माझ्या नावात सत्ता असल्यामुळे मी सत्तेत असतो. आमच्या डबल इंजिन सरकारला आता तिसरे इंजिन जोडले आहे. मी सगळीकडे असतो कारण माझा कुणाशाही पर्मनंट करार नसतो. कारण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही, असे वक्तव्य अल्पसंख्याकमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले आहे.**

दरम्यान अब्दुल सत्तार पुढे बोलताना म्हणाले की, आम्हाला अपात्र ठरविण्यासाठी दानवे सारखे मागे लागले आहेत. मात्र, एखाद्याने गुन्हा केला असेल तर त्याला त्याचे भावना मांडण्याची मुभा असते. म्हणूनच हा देश लोकशाही आहे', असे सत्तार म्हणाले. सध्या कोण कुठल्या पक्षात आहे ते कळतच नाही. जे ट्रिपल इंजिन सरकारमध्ये आले त्यांच्या मतदारसंघात



### सत्तारांचे नेमके वक्तव्य काय?

» अब्दुल सत्तार म्हणाले की, लोक मला विचारतात की, तुम्ही प्रत्येक मंत्रिमंडळात कसे असता? माझ्या नावातून 'र' काढून टाकले की, माझ्या नावातच 'सत्ता' येते. माझा कुणाशीच पर्मनंट करार नसतो, म्हणून मी नेहमी सत्तेत असतो, असे विधान मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले आहे. यामुळे सभागृहात एकच हाशा पिकला होता.

कामे सुरू आहेत,' असा दावाही सत्तार यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा बँकेची सभा झाली. यावेळी सत्तार यांनी राजकीय टोलेबाजी केली. अब्दुल सत्तार म्हणाले की, लोक मला विचारतात की, तुम्ही प्रत्येक मंत्रिमंडळात कसे असता? माझ्या नावातून 'र' काढून टाकले की, माझ्या नावातच 'सत्ता' येते. माझा कुणाशीच पर्मनंट करार नसतो, म्हणून मी नेहमी सत्तेत असतो, असे विधान मंत्री अब्दुल सत्तार यांनी केले आहे. यामुळे सभागृहात एकच हाशा पिकला होता. छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची 40 वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवारी जिल्हा बँकेच्या सभागृहात पार पडली. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देखील टोलेबाजी केली आहे.

दानवे म्हणाले की, अर्जुन गाढे तुम्ही जिल्हा बँकेचे अध्यक्ष झालात, पण शिक्काधारी बनू नका. नाही तर सत्तार म्हणतील तिथे मार शिक्का, मार कोंबडा असे करू नका, पुढे काही झाले तर मैं ने तो कुछ नही किया, वो तो अर्जुनने किया असे म्हणायला देखील सत्तार मागेपुढे पाहणार नाहीत, असे सांगितल्याने सभागृहात हशा पिकला. थकीत कर्जवसुली, अनिष्ट तफावत, दुष्काळ जाहीर करा, नियमित कर्जपरतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान द्या, या मुद्द्यावर ही सभा गाजली. विशेष म्हणजे यावेळी सभेस बँकेचे अध्यक्ष अर्जुन गाढे, मंत्री अब्दुल सत्तार, विरोधी पक्षनेता अंबादास दानवे, आमदार हरिभाऊ बागडे यांच्यासह सदस्यांची उपस्थिती होती. त्यामुळे या सभेत अनेक नेत्यांनी राजकीय टोलेबाजी करत एकेमकांना खोचक टोले देखील लगावले.

# संसदेत महिला आरक्षणावरून गदारोळ!

## » दलित-मागास महिलांना अधिकार मिळत नाही: खरगे

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान मोदींच्या राज्यसभेतील भाषणानंतर विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी भाषण केले. महिला आरक्षण विधेयकावर चर्चा करताना ते म्हणाले- दलित आणि मागास जातीतील महिलांना समान संधी मिळत नाहीत. या विधानावरून सत्ताधाऱ्यांनी गदारोळ सुरू केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या- देशाचे राष्ट्रपती कोण आहेत? त्या आदिवासी समाजातून आलेल्या स्त्री आहेत. तुम्ही ज्या पक्षाचे अध्यक्ष आहात, त्या पक्षाच्या अनेक वर्षांपासून केवळ एक महिला अध्यक्ष आहे.**



सरकार आणि विरोधकांमध्ये बराच वेळ गदारोळ होऊनही खरगे यांनी भाषण सुरूच ठेवले. ते म्हणाले- मी या विधेयकाचे स्वागत करतो. हे विधेयक 2010 मध्ये लोकसभेत मंजूर झाले आहे. कायद्याचा लाभ गरीब आणि महिलांना मिळावा यासाठी मी प्रयत्न करत होतो. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मी बोलत होतो. पण ते मध्येच बोलू लागले. तुमच्या राजवटीत फेडरल संरचना कमकुवत होत आहे, असेही ते म्हणाले. दोन्ही बाजूंना शांत करण्यासाठी उपाध्यक्ष धनखड म्हणाले - आजचा दिवस ऐतिहासिक आहे. हा गोंधळ होऊ देऊ नका. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे, अनेक प्रयत्न झाले पण हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. तत्पूर्वी, पीएम मोदींनी राज्यसभेत सांगितले की, आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी संस्मरणीय आहे. निर्धारित वेळेत आमचे लक्ष्य साध्य करायची आहेत. कारण मी आधी म्हटल्याप्रमाणे देश जास्त वेळ थांबू शकत नाही. राज्यसभेत आमची संख्या कमी होती, पण राज्यसभेत पक्षपाती विचारसरणीच्या वर उठून देशहिताचे निर्णय घेतले जातील, असा आमचा विश्वास होता. उदारमतवादी विचारसरणीमुळेच आज तुमच्या पाठिंब्याने आम्ही असे अनेक कठीण निर्णय घेऊ शकलो आणि राज्यसभेची प्रतिष्ठा वाढवण्याचे काम पुढे सरकले. नवीन इमारत एका महत्त्वाच्या निर्णयाची साक्ष देत आहे. हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले, तिथे चर्चा झाल्यानंतर हे विधेयक इथेही येईल. महिला सक्षमीकरणाशी संबंधित हे विधेयक आहे. आमचा प्रयत्न राहिला आहे की राष्ट्र उभारणीत अनेक क्षेत्रे आहेत ज्यात महिलांची भूमिका सुनिश्चित केली जात आहे. आम्ही मुलींसाठी सैनिक शाळांचे दरवाजे उघडले आहेत. आपण जितक्या जास्त सुविधा देऊ तितकी आपल्या मुलींची प्रगती होईल. अटलजींनी खूप प्रयत्न केले, पण त्यांना मार्क्स कमी पडले. काही राजकीय विरोधही झाला. आता हे विधेयक नवीन सभागृहात मांडून आम्ही महिला शक्तीचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी एक पाऊल उचलले आहे. घटनादुरुस्ती म्हणून नारी शक्ती वंदन कायदा लोकसभेत आणला गेला. त्यानंतर एक-दोन दिवसांत ते राज्यसभेत आणले जाईल. सर्वांनी एकमताने या विधेयकाला पाठिंबा द्यावा.

### दोन्ही बाजूचे सर्व खासदार भावूक

» 96 वर्षे जुन्या संसद भवनातील कामकाजाचा मंगळवारी शेवटचा दिवस होता. स्वातंत्र्य आणि संविधानाची साक्षीदार असलेल्या या वास्तूला निरोप देण्यासाठी दोन्ही बाजूचे सर्व खासदार आले होते. पंतप्रधानांनी सर्वांसोबत फोटो काढले. यानंतर सर्व खासदार सेंट्रल हॉलमध्ये पोहोचले. सेंट्रल हॉलमध्ये अनुभव सांगताना काही खासदार भावूक झाले, तर काहींनी हा अभिमानाचा क्षण असल्याचे म्हटले. पंतप्रधान म्हणाले की संसदेचे सेंट्रल हॉल आपल्याला भावनिक बनवते आणि कर्तव्यासाठी प्रेरित करते. येथेच 1947 मध्ये ब्रिटिश सरकारने सत्ता हस्तांतरित केली. पुढे राज्यघटनेनेही येथे आकार घेतला. पंतप्रधान म्हणाले- आज आपण येथून निरोप घेणार आहोत आणि संसदेच्या नवीन इमारतीत बसणार आहोत आणि गणेश चतुर्थीच्या दिवशी आपण तिथे बसलो आहोत हे खूप शुभ आहे. आज नवीन संसद भवनात आपण सर्वजण मिळून नवीन भविष्यासाठी श्री गणेशाची निर्मिती करणार आहोत.

---

# पत्नीने लैंगिक संबंधांस नकार देणे क्रूरता : कोर्ट

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणावर सुनावणी करताना म्हटले आहे की, लग्नानंतर तुमच्या जोडीदाराला सेक्ससाठी नकार देणे ही क्रूरता आहे. सेक्सशिवाय विवाह हा एक शाप आहे. लग्नानंतर लैंगिक संबंधांमध्ये सतत निराशा यापेक्षा अधिक घातक काहीही असू शकत नाही. या प्रकरणात पत्नीच्या विरोधामुळे लग्नाचा उद्देश पूर्ण होत नाही.

वास्तविक, या जोडप्याने 2004 मध्ये हिंदू रितीरिवाजांनुसार लग्न केले होते. यानंतर महिला तब्बल 35 दिवस पतीसोबत राहिली. लग्नानंतरही ही महिला गेल्या 18 वर्षांपासून तिच्या माहेरच्या घरी राहत होती. पत्नी सासरच्या घरी परतली नाही तेव्हा पतीने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटाची याचिका दाखल केली. त्यानंतर कोर्टाने घटस्फोटाचा निर्णय दिला. कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला महिलेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पती आणि सासरचे लोक हुंड्यासाठी छळ करत असल्याचा आरोप महिलेने केला आहे. न्यायमूर्ती सुरेश कुमार कैत आणि न्यायमूर्ती नीना बन्सल कैत यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान महिलेची याचिका फेटाळून लावली.

हुंड्यासाठी तिचा छळ झाला हे महिला सिद्ध करू शकली नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. कौटुंबिक न्यायालयाने या प्रकरणी योग्य निर्णय दिला होता. मात्र, महिलेने तिच्या पतीला सोडले असल्याचे सिद्ध झालेले नाही. पण महिलेने 18 वर्षे पतीसोबत जे केले ते क्रूर आहे. या आधारावर पती महिलेला घटस्फोट देऊ शकतो.

# सोशल मीडिया वापराचे वय ठरवावे!

## » डोके भ्रष्ट करणाऱ्या गोष्टी काढून टाका

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्नाटक उच्च न्यायालयाने 19 सप्टेंबर रोजी सांगितले की, सरकारने सोशल मीडिया वापरण्याचे वय निश्चित करावे. जसे दारू पिण्याचे एक निश्चित वय असते. कोर्टाने म्हटले की, सोशल मीडियाचा वापर करणे ही चांगली गोष्ट आहे, मात्र आजकाल शाळेत जाणाऱ्या मुलांना त्याचे व्यसन लागले आहे. अशा परिस्थितीत सोशल मीडिया वापरण्यासाठी वय निश्चित करणे वरदान ठरेल.**



न्यायालयाने म्हटले की, 17 किंवा 18 वर्षे वयोगटातील तरुण सोशल मीडियाचा भरपूर वापर करतात, पण देशाच्या हितासाठी काय योग्य आहे आणि काय नाही हे ठरवण्याची परिपक्वता त्यांच्यात आहे का? मन भ्रष्ट करणाऱ्या अशा गोष्टी सोशल मीडियावरूनच नाही तर इंटरनेटवरूनही काढून टाकल्या पाहिजेत. याचा विचार सरकारने करायला हवा. न्यायमूर्ती जी नरेंद्र आणि न्यायमूर्ती विजय कुमार ए पाटील यांच्या खंडपीठाने एक्सच्या याचिकेवर सुनावणी करताना (जे आधी ट्विटर होते) या गोष्टी सांगितल्या. न्यायमूर्ती जी नरेंद्र तोंडी म्हणाले की, सरकारने सोशल मीडिया वापरण्यासाठी वयोमर्यादा निश्चित करण्याचा विचार करावा. जेव्हा वापरकर्ता नोंदणी करतो तेव्हा त्याला आवश्यक माहिती प्रदान करावी लागेल, जसे की ऑनलाइन गेमिंगसाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. खरं तर, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती मंत्रालयाने 2 फेब्रुवारी 2021 ते 28 फेब्रुवारी दरम्यान X (पूर्वीचे ट्विटर) साठी आदेश जारी केले होते. ज्यामध्ये 1474 अकाऊंट, 175 ट्विट, 256 URL आणि एक हॅशटॅग ब्लॉक करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यातील 39 URL शी संबंधित आदेशांना X ने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. 30 जून रोजी उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने एक्सची याचिका फेटाळली होती. तसेच शासनाच्या आदेशाचे पालन न केल्याने 50 लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. अपील स्वीकारताना न्यायालयाने कंपनीला दंडाच्या रकमेच्या 50 टक्के रक्कम जमा करण्यास सांगितले होते. कंपनीला दंड आकारणे अन्यायकारक आहे, असा युक्तिवाद एक्सने याचिकेत केला होता. न्यायालयाने एकल खंडपीठाचा निर्णय कायम ठेवल्यास केंद्र सरकारला दिलासा मिळेल.

**गणेशोत्सवाची जोरात धामधूम सुरू आहे. गणेशोत्सवात मोठा उत्साह असतो. प्रत्येक गावांत, शहरातील गल्ली गल्लीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सर्जनशील आणि आकर्षक सजावटीसह गणेशोत्सव साजरा करतात. पुणे तसेच मुंबई, कोकणातील काही गणेश मंदिरे आहेत ज्यांचा गणेशोत्सव फार वेगळा आणि पाहण्यासारखा असतो. अशा या 8 प्रसिद्ध गणेश मंदिरांना आवश्य भेट द्या. या 8 गणेश मंदिरांविषयी विशेष माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**



# गं गणपतये नमः

## पुण्यातील कसबा गणपती-



पुण्यातील ज्या ठिकाणी गणेशोत्सव सुरू झाला. सर्वांचा पहिला मानाचा (पूज्य) गणेश म्हणजे कसबा गणेशोत्सव मंडळाचा कसबा गणपती. पुण्यातील सर्व गणपतींच्या महत्त्वाच्या यादीत हा सर्वात वरच्या स्थानी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांनी 1639 मध्ये बांधलेले हे गणेश मंदिर 10 व्या दिवशी विसर्जन करण्यात येतो. कसब्यानंतरच इतर सर्व मंडळे आपापल्या उत्सवात पुढे जातात. किंबहुना, या गणेशाचे महत्त्व इतके आहे की, महापौर स्वत: पूजेला जातात.

## केसरीवाडा गणपती-



शेवटचा पण सर्वात कमी मानाचा गणपती म्हणजे केसरीवाडा गणपती. 1894 मध्ये स्वतः बाळ टिळकांनी वसाहतवाद्यांच्या विरोधात जनतेला एकत्र आणण्याचा एक मार्ग म्हणून सुरुवात केली, त्यांनी आतापर्यंतची सर्वात यशस्वी क्रांती सुरू केली. आजही, केसरीवाडा ट्रस्ट सजावटीवर कमी आणि लोकांना एकत्र आणणाऱ्या आणि बंधुत्वाची भावना निर्माण करणाऱ्या विविध उपक्रमांवर जास्त खर्च करते.

## तांबडी जोगेश्वरी गणपती -



पुण्याचा दुसरा मानाचा (पूज्य) गणपती म्हणजे तांबडी जोगेश्वरी. 15 व्या शतकात बांधलेले हे मूळत: दुर्गा देवीचे मंदिर आहे. गणेशमूर्तीचे विसर्जन केले जाते आणि त्यानंतर सलग वर्षभर इतर गणेश मंदिरांप्रमाणे त्याची स्थापना केली जाते. सजावट इतकी सुंदर असते की, खरोखरच पाहून तुमचे मन प्रसन्न होईल.

## सिद्धिविनायक गणपती-



आर्थिक राजधानीचा सर्वात प्रसिद्ध गणपती, प्रभादेवी, मुंबई येथे आहे. भारतातील सर्वात श्रीमंत मंदिरांपैकी एक, त्याचा गणेशोत्सव उत्सव पाहून तुम्ही खुश व्हाल. कारण त्यांची असलेली सुंदर वास्तुकला पाहिल्यानंतर निश्चितच फायदेशीर ठरेल.

## गुरुजी तालीम गणपती-



पुण्याचा तिसरा मानाचा गणपती, तो 1887 मध्ये भिकू शिंदे आणि उस्ताद नलबान या हिंदू आणि मुस्लिम कुटुंबांनी बांधले होते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्याआधी त्याची स्थापना केल्यामुळे या मंदिराला सर्वात जुन्या मंदिरांपैकी एक असल्याचा मान मिळाला.

## दगडूशेठ हलवाई-



पुण्याला भेट द्यायलाच हवी, हे पूर्वेकडील ऑक्सफर्डचे सर्वात श्रीमंत गणेश मंदिर आहे. मूर्ती सोन्याने मढवली असून मंदिरात सर्वत्र श्रीमंती दिसून येते. दगडूशेठ गणपतीचा तब्बल 10 दशलक्ष रुपयांचा विमा उतरवला आहे!!!



## तुळशीबाग गणपती-



पुण्याच्या मध्यभागी असलेला हा शहरातील चौथा मानाचा गणपती आहे. शहराच्या मध्यभागी असल्यामुळे सर्वात जास्त भेट दिलेल्या गणेश मंदिरांपैकी एक असल्याचा अभिमान बाळगण्याचा अधिकार मिळतो. येथील विधी तुम्हाला थक्क करून सोडतील.



## गणपतीपुळे गणपती-



गणपतीपुळे हे कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्यात वसलेले एक छोटे शहर आहे, ज्यामध्ये प्राचीन समुद्रकिनारे आहेत. व्यस्त दैनंदिन जीवनापासून दूर जाण्यासाठी आणि शहराच्या गजबजाटातून आणि आपल्या कुटुंबासह, मित्रमैत्रिणींसोबत किंवा आपल्या जोडप्यासह नैसर्गिक सौंदर्यादरम्यान दर्जेदार वेळ घालवण्यासाठी हे लहान समुद्रकिनारा शहर योग्य ठिकाण आहे.

# इंडिया थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार!

## » भारतीय संघ उपांत्यपूर्व फेरीचा सामना 3 ऑक्टोबरला खेळणार

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशियाई क्रीडा २०२३ स्पर्धेला मंगळवारपासून सुरूवात होत आहे. यामध्ये २७ सप्टेंबरपासून पुरुष क्रिकेटला सुरुवात होणार आहे. टीम इंडिया थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार असून हा टी-२० फॉरमॅट असणाप आहे. याआधी ९ सामने खेळवले जाणार आहेत. गटातील सामने जिंकणाऱ्या संघांना गुणांच्या आधारे उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळेल. भारतीय संघ उपांत्यपूर्व फेरीचा सामना ३ ऑक्टोबरला खेळणार आहे. तर पाकिस्तानचा सामनाही ३ ऑक्टोबरलाच होणार आहे.**

भारतीय महिला संघ २१ सप्टेंबरला सामना खेळणार आहे. उपांत्यपूर्व फेरीसाठीही ती मैदानात उतरणार आहे.आशियाई क्रीडा स्पर्धेतील महिला क्रिकेटमधील पहिला सामना इंडोनेशिया आणि मंगोलिया यांच्यात होणार आहे. तसेच टीम इंडिया थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार आहे. भारतासोबतच पाकिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंकेचे संघही उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत.

भारतीय महिला संघाचा सामना २१ सप्टेंबरला आहे. त्याच दिवशी पाकिस्तानचा सामनाही होणार आहे. भारतीय महिला संघ जिंकल्यास २४ सप्टेंबर रोजी उपांत्य फेरीचा सामना खेळेल. यानंतर २५ सप्टेंबरला अंतिम सामना होणार आहे. २७ सप्टेंबरपासून पुरुष



क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होणार आहे. यामध्ये पहिला सामना नेपाळ आणि मंगोलिया यांच्यात होणार आहे. यामध्ये टीम इंडियाचा उपांत्यपूर्व सामना ३ ऑक्टोबरला होणार आहे. यामध्येही भारतासह पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेशचे संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत. पुरुष क्रिकेटचा उपांत्य सामना ६ ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल. त्याचा अंतिम सामना ७ ऑक्टोबरला होणार आहे. या स्पर्धेसाठी भारताची कमान ऋतुराज गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. आशियाई खेळ २०२३ क्रिकेटचे थेट प्रक्षेपण सोनी लीव्हेह बसाइट आणि ॲपवर उपलब्ध असेल. आशियाई खेळ २०२३सोनी स्पोर्ट्स नेटवर्क टीव्ही चॅनेलवर थेट प्रक्षेपित केले जातील.

### पुरुष संघाचे वेळापत्रक

» २७ सप्टेंबरपासून पुरुष क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होणार आहे. यामध्ये पहिला सामना नेपाळ आणि मंगोलिया यांच्यात होणार आहे. यामध्ये टीम इंडियाचा उपांत्यपूर्व सामना ३ ऑक्टोबरला होणार आहे. यामध्येही भारतासह पाकिस्तान, श्रीलंका आणि बांगलादेशचे संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचले आहेत. पुरुष क्रिकेटचा उपांत्य सामना ६ ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल. त्याचा अंतिम सामना ७ ऑक्टोबरला होणार आहे. या स्पर्धेसाठी भारताची कमान ऋतुराज गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

भारतीय पुरुष क्रिकेट संघ: ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल, राहुल त्रिपाठी, तिलक वर्मा, रिंकू सिंग, जितेश शर्मा, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, आवेश खान, अर्शदीप सिंग, मुकेश कुमार, शिवम दुबे, प्रभसिमरन सिंग, आकाश दीप. राखीव: यश ठाकूर, साई किशोर, व्यंकटेश अय्यर, दीपक हुडा, साई सुदर्शन भारतीय महिला क्रिकेट संघ: हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा, ऋचा घोष, अमनजोत कौर, देविका वैद्य, पूजा वस्त्राकर, तीतस साधू, राजेश्वरी गायकवाड, मिन्नू मणी, कनिका आहुजा, उमा छेत्री, अनुषा बारेड्डी.

# रजनीकांत, सचिन, बिग बींना 'गोल्डन तिकीट!

## » अवघ्या महिन्याभरात भारतात भरणार क्रिकेटचा महामेळा

नवी दिल्ली।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**बीसीसीआयचे सचिव जय शाह सध्या काही सेलिब्रिटी मंडळींना 'गोल्डन तिकीट' देत असल्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. ही मंडळीही साधीसुधी नसून आपापल्या क्षेत्रातील नामवंत प्रथितयश मंडळी आहेत. त्यामुळे त्यांना बीसीसीआय नेमकं हे तिकीट का देत आहे? हे तिकीट नेमका काय प्रकार आहे? हा कुठला पुरस्कार आहे की खरंच हे कशाचं तिकीट आहे? अशा अनेक प्रश्नांचा सध्या सोशल मीडियावर भडिमार होऊ लागला आहे.**

नुकतंच BCCI चे सचिव जय शाह यांनी सुप्रसिद्ध अभिनेते रजनीकांत यांना गोल्डन तिकीट दिलं असून त्याचे फोटोही बीसीसीआयनं आपल्या ट्विटर हँडलवर शेअर केले आहेत. "चित्रपटाच्याही पलीकडील




महान व्यक्तीमत्व! बीसीसीआयचे मानद सचिव जय शाह यांनी श्री रजनीकांत यांना गोल्डन तिकीट दिलं. भाषा व संस्कृतीच्याही पलीकडे जाऊन या महान अभिनेत्याने लाखो चाहत्यांच्या मनांवर अमिट छाप उमटवली आहे", असं या ट्वीटमध्ये म्हटलं आहे. बीसीसीआयनं रजनीकांत यांच्याआधी गेल्या महिन्याभरात बॉलिवुडचे सुपरस्टार बिग बी अमिताभ बच्चन यांना अशाच प्रकारे गोल्डन तिकीट दिलं आहे. त्याव्यतिरिक्त मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरलाही हे गोल्डन तिकीट देण्यात आलं आहे. बीसीसीआयनं केलेल्या ट्वीटमध्ये वर्ल्डकप २०२३ चा उल्लेख करण्यात आला आहे. अवघ्या महिन्याभरात क्रिकेटचा महामेळा भारतात भरणार आहे. त्यामुळे क्रिकेटप्रेमींसाठी ही मोठी पर्वणी असताना बीसीसीआयनंही त्यासाठी कंबर कसली आहे. स्पर्धेच्या नियोजनासोबतच आपापल्या क्षेत्रात दिग्गज ठरलेल्या व्यक्तिमत्वांना स्पर्धेसाठी आमंत्रित करून या स्पर्धेचा स्तर अधिक उंचावण्याचा प्रयत्न बीसीयीआयकडून करण्यात येत आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांना वर्ल्डकप २०२३ साठी बीसीसीआयकडून आमंत्रित केलं जात आहे. त्यासाठी हे 'गोल्डन तिकीट' या मान्यवरांना दिलं जात आहे. आत्तापर्यंत सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन व रजनीकांत या तिघांना हे देण्यात आलं असून या यादीत आणखीही काही

### गोल्डन तिकीट आणि विशेष सवलती...

» गोल्डन तिकीट असणारी व्यक्ती ही बीसीसीआयची विशेष आमंत्रित पाहुणी असते. स्पर्धेतील सामने बघण्यासाठी त्यांना खास आमंत्रण दिलं जातं. या व्यक्तींची बसण्याची सोय स्टेडियममधील व्हीआयपी बॉक्समध्ये केली जाते. त्यांची एखाद्या पाहुण्याप्रमाणेच स्टेडियमवर बडदास्त ठेवली जाते. या व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या प्रीत्यर्थ आदरभावना व्यक्त करण्यासाठी त्यांना हे 'गोल्डन तिकीट' दिलं जातं. मात्र, दुसरीकडे या सेलिब्रिटी व्यक्तींच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची प्रसिद्धी साध्य करण्याचा आयोजकांचा हेतू असल्याचंही सांगितलं जातं.

नावं जोडली जाण्याची शक्यता आहे. गोल्डन तिकीट असणारी व्यक्ती ही बीसीसीआयची विशेष आमंत्रित पाहुणी असते. स्पर्धेतील सामने बघण्यासाठी त्यांना खास आमंत्रण दिलं जातं. या व्यक्तींची बसण्याची सोय स्टेडियममधील व्हीआयपी बॉक्समध्ये केली जाते. त्यांची एखाद्या पाहुण्याप्रमाणेच स्टेडियमवर बडदास्त ठेवली जाते. या व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या प्रीत्यर्थ आदरभावना व्यक्त करण्यासाठी त्यांना हे 'गोल्डन तिकीट' दिलं जातं. मात्र, दुसरीकडे या सेलिब्रिटी व्यक्तींच्या उपस्थितीमुळे स्पर्धेची प्रसिद्धी साध्य करण्याचा आयोजकांचा हेतू असल्याचंही सांगितलं जातं. अर्थात, गोल्डन तिकिट असणाऱ्या व्यक्तीला स्पर्धेतील सर्व सामन्यांना प्रवेश असला, तरी प्रत्यक्ष काही निवडक सामन्यांना ही सेलिब्रिटी मंडळी उपस्थिती लावतात. अशा वेळी त्यांच्या उपस्थितीची बरीच चर्चाही होते. त्यामुळे यंदाच्या वर्ल्डकपमध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याबरोबरच सेमीफायनल, फायनल अशा महत्त्वाच्या सामन्यांमध्ये यंदाचे गोल्डन तिकीटाचे मानकरी दिसण्याची शक्यता आहे!